# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

(महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीची कंपनी)
CIN: 70200MH1998SGC116664
५वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी ०२२-६९२० ६९२०
Email. sppl_mumbai@rediffmail.com ,Website : www.sppl.biz


## जाहिरात

शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, मुंबई येथील कार्यालयात निव्वळ कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णय क्रमांक: संकीर्ण-२७१५/प्र.क्र. १००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील तरतुदी नुसार राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कडून खालील विवक्षित कामे पार पाडण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित या संपूर्णत: राज्य शासन स्वामित्व कंपनी असून मुंबई महानगर प्रदेश परिक्षेत्रात परवडणाऱ्या घरांचे प्रकल्प व बृहन्मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्याचे व त्यातील विक्री घटकातून परवडणारी घरे उपलब्ध करणे प्रस्तावित आहे. तसेच शिपुप्रम मार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून काही रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना (आर्थिकदृष्टया व्यवहार्य आणि दावामुक्त) घेणार आहे. त्यामुळे रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यास हाती घेतल्यानंतर कार्यालयीन कामकाजात वाढ होणार आहे.

**अ) पदासाठी अर्हता व अनुभव**

१. कार्यकारी अभियंता या पदावरील कामाचा एकत्रित अनुभव कमीत कमी १० वर्षे इतका असावा.

उपसमाज विकास अधिकारी या पदावरील कामाचा एकत्रित अनुभव कमीत कमी १० वर्षे इतका असावा.

२. उमेदवाराविरूध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी विरूध्द त्यांना शिक्षा झालेली नसावी.

**ब)	वयोमर्यादेची अर्हता**

१.	अर्जदाराचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**क)	करार पध्दतीने करावयाच्या नियुक्तीबाबत अटी व शर्ती:-**

१.	करार पध्दतीने नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एक वर्षासाठी देण्यात येईल. मात्र एकूण कालावधी तीन वर्षे पेक्षा जास्त असणार नाही.

**ड)	नियुक्ती कालावधीत मासिक पारिश्रमिक व भत्ते प्रकरणी दि. १७.१२.२०१६ व दि. ०८.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.**

१.	संदर्भीय शासन निर्णयान्वये, सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना नियुक्तीच्या वेळी महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतना एवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्ती वेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.

२.	पारिश्रमिक रकमेची गणना करणेकामी सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले एकूण वेतन व एकूण आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन या संबंधातील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

३.	करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत / सामावून घेण्याबाबतचे या नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्यास अधिकार / हक्क नसेल.

४.	नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तरी बंधपत्र / हमीपत्र रू. ५००/- चे नोंदणीकृत स्टॅम्पपेपरवर नियुक्तीच्या वेळी देणे आवश्यक आहे. तसेच सदर बंधपत्रात / हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने व विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती. करार पध्दतीवरील उमेदवारीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही. याचा समावेश करून सदर अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेख करारात करण्यात यावा.

५. मा. व्यवस्थापकीय संचालक, शिपुप्रम यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी / कर्मचारी यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्यात अधिकार राहतील.

६. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

७. नियुक्त अधिकारी यांनी त्याच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

८. अर्ज करण्याच्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधित कार्यालयाकडून प्रमाणित करून तसे प्रमाणपत्र सादर करावे. तसेच प्रशस्तीपत्रक नेपुण्यपुर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

९. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नियुक्तीच्या ठिकाणी आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत रूजू होणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१०. वरीलपैकी एकाही अटीची पूर्तता होत नसलेस अर्जदार याचा अर्ज अपात्र ठरेल. तसे ज्याचा अर्ज अपात्र ठरतील त्यांना याबाबत काहीही कळविले जाणार नाही. तसचे कोणतेही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची सर्व अर्जदारानी नोंद घ्यावी.

११. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

**इ) आवश्यक सूचना**

१. सदर पदाकरिता करावयाचे अर्जाचा नमुना जाहिराती सोबत जोडण्यात आलेला आहे. सदर विहित नमुन्यातील अर्ज स्वत:च्या हस्ताक्षरात किंवा टंकलिखित करून फोटोसह सादर करण्याचा आहे. विहित नमुन्यात नसलेले व अपूर्ण अर्ज अपात्र समजण्यात येतील.

२. अर्जामध्ये उमेदवाराने संपूर्ण नाव, पत्रव्यवहाराचा पत्ता, जन्मतारीख, वय, शैक्षणिक अर्हताबाबतचा संपूर्ण तपशील, कामाचा अनुभव असल्यास त्याबाबत तपशील इत्यादी माहिती नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण माहिती भरलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

३. अर्जासोबत २२ से.मी. १२ से.मी. आकाराचा, स्वत:चे नाव व पत्यासह पोष्टाचे रूपये १०+ २ चे तिकीट लावलेला लिफाफा जोडावा.

४. उमेदवारांनी आपले अर्ज समक्ष किंवा पोस्टाव्दारे व्यवस्थापक (प्रशासन), शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, ५वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ या पत्यावर जाहिरात प्रसिध्द झालेल्या तारखेपासून दि. ११ मार्च, २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा बेताने पाठवावीत त्या नंतर पोस्टाव्दारे वा अन्य प्रकारे प्राप्त होणाऱ्या अर्जाची अथवा त्यासंबंधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

५. वयाबाबत जन्मतारखेचा दाखला / शाळा सोडलेला दाखला / सेवापुस्तकांचे पहिल्या पानाची प्रत यावरून ग्राहय धरता येईल. सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत दाखला जोडलेला नसल्यास अर्ज आपोआप अपात्र ठरेल.

६. वरीलपैकी एकाही अटीची पूर्तता होत नसल्यास अर्जदार यांचा अर्ज अपात्र ठरेल. तसेच ज्यांचे अर्ज अपात्र ठरतील त्यांना याबाबत काहीही कळविले जाणार नाही. तसचे कोणत्याही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

७. सदरचे प्रक्रिया पदांचे फेरबदल तसेच नियुक्ती प्रक्रिया कोणत्या कारणास्तव स्थगित अथवा रद्द करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक, शिपुप्रम राखून ठेवीत आहेत.

# अर्जाचा नमुना

राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कार्यकारी अभियंता या अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

अर्जदाराने अलिकडच्या काळातील<br>स्वत:चे छायाचित्र येथे चिटकवावे

**१. अर्जदाराचे संपूर्ण नाव:-**

**२. अर्जदाराचा पत्ता :-**

**३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम व कार्यालय :-**

**४. जन्म दिनांक व वय:-**

**५. सेवानिवृत्तीचा दिनांक :-**

**६. शैक्षणिक अर्हता :-**

**७. अनुभव:-**

**८. भ्रमणध्वनी क्रमांक:-**

उपरोक्त पदावर करार पध्दतीने नियुक्तीबाबत जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून, सदर सुचनेतील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:-

दिनांक:- अर्जदाराची स्वाक्षरी